3 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कुलगुरू डॉ. शिर्के : इचलकरंजीत जिल्हास्तरीय युवा महोत्सव

# कलेमुळे शरीरासह मनही तंदुरुस्त

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता.२ : 'प्रत्येक कला प्रकार जीवन जगण्यासाठी उत्तम व्यायाम आहे. यामुळे शरीरासह मनही तंदुरुस्त राहते. अशा कलामहोत्सवातून भरडधान्याचा केला जाणारा प्रचार आणि प्रसार करण्याची प्रमुख जबाबदारी आता युवकांवर आली आहे. येत्या काळात युवकांचा पौष्टिक खाण्याकडे कल असावा,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कृषी आयुक्तालय, पुणे, डी.के.टी.ई.सोसायटीचे इचलकरंजी हायस्कूल व ज्यु. कॉलेज आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृहात जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे यासाठी या महोत्सवाचे आयोजन केले आहे. डीकेटीई संस्थेच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

'वैद्यकीय सेवा कितीही अद्ययावत झाली तरी आज आजार वेगाने वाढत आहेत. त्याचा सामना करण्यासाठी दैनंदिन जीवनात भरडधान्याचे महत्त्व गडद होत आहे. युवा महोत्सवाचे व्यासपीठ तरुणांच्या कलागुणांना प्रकाशझोतात आणते. यातून घडणारी तरुणपिढी देशाचे नेतृत्व करेल,' असा विश्वास आवाडे यांनी यावेळी व्यक्त केला.



**इचलकरंजी : युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. सपना आवाडे, प्रा. शेखर शहा संजय शेटे आदी.**

प्रारंभी पदन्यास नृत्य कला अकादमीच्या वतीने गणेशवंदना करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागत जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती नीलिमा अडसूळ यांनी केले. इचलकरंजी हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती वरदा उपाध्ये यांनी आभार मानले. राजलक्ष्मी कदम यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राज्य युवा पुरस्कार्थी अवधूत गायकवाड, क्रीडाधिकारी मनीषा पाटील, प्रा. शेखर शहा, इचलकरंजी महानगरपालिका क्रीडा अधिकारी संजय शेटे आदी उपस्थित होते. महोत्सवामध्ये लोकगीत, लोकनृत्य, कथाकथन, वस्त्रोद्योग व ॲग्रो प्रॉडक्ट व संकल्पना आधारित विविध कलाप्रकार सादर झाले.

### स्वागताला नाचणीचे आंबील

**■ यंदा युवा महोत्सवासाठी 'पौष्टिक तृणधान्य उत्पन्नवाढीसाठी विज्ञानाचा वापर' ही संकल्पना आहे. त्यामुळे महोत्सवदिनी स्वागताला प्रवेशद्वारावरच सर्वांना नाचणीचे आंबील पेय देण्यात आले. यासह सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान या संकल्पनेवर आधारित तृणधान्यावर प्रदर्शन मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला.**

3 DEC 2023 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कलेतून शारीरिक, मानसिक आरोग्य

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : इचलकरंजीत जिल्हास्तर युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** मैदानी खेळ आणि कला हे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य राखण्यासाठी मदत करतात. त्याचबरोबर भरडधान्याचा प्रचार आणि प्रसार करणे, त्याचे सेवन करणे याची जबाबदारी आता युवकांवर आलेली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि इचलकरंजी हायस्कूल व ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी घोरपडे नाट्यगृह येथे जिल्हास्तर युवा महोत्सव घेण्यात आला. त्याच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी डॉ. सपना आवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिर्के म्हणाले, युवा महोत्सवाचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम कौतुकास्पद आहे. याच उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर निश्चितपणे पोहोचतील. डॉ. आवाडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी पदन्यास नृत्य कला अकादमीच्या वतीने गणेशवंदना केली. महोत्सवामध्ये लोकगीत, लोकनृत्य, कथाकथन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, फोटोग्राफी, हस्तकला, वस्त्रोद्योग व ॲग्रो प्रॉडक्ट व संकल्पना आधारित स्पर्धांचे आयोजन केले होते. तर पौष्टिक तृणधान्य उत्पन्नवाढीसाठी विज्ञानाचा वापर व सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान या संकल्पनेवर आधारित प्रदर्शन मांडले होते. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ यांनी केले. सूत्रसंचालन राजलक्ष्मी कदम यांनी केले. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, अवधूत गायकवाड, क्रीडाधिकारी मनिषा पाटील, प्रा. शेखर शहा, संजय शेटे आदी उपस्थित होते. आभार वरदा उपाध्ये यांनी मानले.



इचलकरंजीत घोरपडे नाट्यगृह येथे आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवात युवतींनी पोवाडा सादर केला.

3 DEC 2023

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ.डी.टी.शिर्के यांची डीकेटीईस भेट

इचलकरंजी ता.२

....................

डिसेंबरः शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. डी.टी. शिर्के यांनी डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूटला सदिच्छा भेट दिली आणि इन्स्टिटयूटच्या विविध पदाधिका-यांशी चर्चा केली. इचलकरंजी मध्ये कार्यक्रमासाठी आले असता सुरवातीस संस्थेच्या मानद सचिव डॉ सपना आवाडे यांनी कुलगुरु यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. डी.टी.शिर्के, यांनी डीकेटीईस दिलेल्या भेटीच्या वेळी स्वागत करताना मानद सचिव डॉ. सपना आवाडे, डॉ.एल.एस.अडमुठे व अन्य.

मानद सचिव डॉ सपना आवाडे व प्र. संचालिका डॉ एल.एस.अडमुठे यांनी डीकेटीईतील नवनविन शैक्षणिक उपक्रम जसे की ५जी लॅब, आयडिया लॅब, सेंटर ऑफ एक्सलन्स इन नॉनओव्हनस इ. प्रकल्पांची विस्तृत माहिती दिली व नुकतेच महाराष्ट्र राज्य सरकार वस्त्रोद्योग विभाग यांचेशी, वस्त्रोद्योग व्यवसायास चालना देण्यासाठी आणि विद्यार्थी कल्याणासाठी झालेला सामंजस्य करार याची माहिती देत पॉलीस मेकिंग व ही पॉलीसी प्रत्येक्षात अंमलात आणण्यामध्ये डीकेटीईचा असणारा सहभाग याविषयीही माहिती दिली.

कुलगुरु यांनी मानद सचिव डॉ सपना आवाडे, ट्रस्टी शेखर शहा, प्र. संचालिका प्रा. डॉ. एल.एस.अडमुठे, डे. डायरेक्टर डॉ यु.जे.पाटील, विभागप्रमुख डॉ. व्ही.आर.नाईक यांच्याशी संवाद साधला. शिक्षण क्षेत्रात होत असलेले बदल व शैक्षणिक संस्थानी आमलात आणवयाच्या गोष्टी यावर कुलगुरु यांनी विस्तृतपणे चर्चा केली. त्याचबरोबर डीकेटीई संस्थेचे इंजिनिअरींग एज्यूकेशन मध्ये असलेले कार्य हे खुपच कौतुकास्पद आहे असे नमूद केले. ते म्हणाले, डीकेटीई वस्त्रोद्योगाचे शहर असलेल्या इचलकरंजीमध्ये वास्तव्यास आहे. विविध अभ्यासक्रमामध्ये टेक्स्टाईल एज्यूकेशन देणारी ही एकमेव संस्था आहे व तीचे वेगळेपण जाणवते. डीकेटीईचे अनेक परदेशी शैक्षणिक विद्यापीठ व इंडस्ट्रीजशी सुरुवातीपासूनच चांगले संबंध आहेत तसेच माजी विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट नेटवर्क आहे. त्यामुळे डीकेटीईचे शैक्षणिक कार्य हे वाखणण्यासारखे आहे असेही ते म्हणाले. इन्स्टिटयूटच्या पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

3 DEC 2023
महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात साकारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल

कोल्हापूर,ता.२(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या कुस्ती संकुल इमारतीचे भूमीपूजन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांच्या हस्ते आणि महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाजवळील एन.सी.सी. भवनच्या मागील बाजूस आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती संकुलाची भव्य इमारत उभी राहणार आहे. पहिल्या टप्प्यांत या इमारतीचे ८७७.८५ चौरस मीटर इतक्या क्षेत्रफळाचे बांधकाम करण्यात येणार आहे. या संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन मॅट बसविण्यात येणार आहेत.



कुस्ती संकुल इमारतीच्या भुमीपूजनाप्रसंगी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत, मंत्री चंद्रकात पाटील व इतर मान्यवर.

या संकुलाचे भुमीपूजन व कोनशिला अनावरण मुख्यमंत्री डॉ. सावंत आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी संकुलाचा आराखडा पाहून समाधान व्यक्त केले, तसेच संकुल उभारणीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ.महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.प्रकाश गायकवाड, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ.धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.तानाजी चौगुले, डॉ.गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजीत यादव, डॉ.वैभव ढेरे यांच्यासह व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्या परिषद आदी विविध अधिकारी मंडळाचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

- 3 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गावागावांतून विविध प्रकारच्या उत्पादनवाढीला प्रोत्साहन

- आत्मनिर्भर भारत योजनेतून सर्वच घटकांना प्रेरणा
- गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात उलगडले 'स्वयंपूर्ण गोव्या'चे गमक

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या आत्मनिर्भर भारत योजनेतून सर्व घटकांना प्रेरणा देण्याचे काम केले आहे. याअंतर्गत सर्वच क्षेत्रांत भरीव योगदान देऊन युवा पिढीच नवा भारत घडवेल. त्या दृष्टीने आत्मनिर्भर भारत ही संकल्पना ऊर्जास्रोत म्हणून काम करेल, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठात 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. प्रमुख पाहूणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले, गोवा राज्यात प्रथम 'स्वयंपूर्ण मित्र' ही संकल्पना राबविली. या माध्यमातून राज्यातील प्रत्येक कुटुंबाला वीज, पाणी, शौचालय आदी सुविधांची उपलब्धता केली. दिव्यांगांसह सर्व नागरिकांना सामाजिक सुरक्षा, आरोग्यसुविधा, कृषीसंपदा संवर्धनासाठी साधनसुविधा पुरविली. राज्यात कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्या गावच्या कल्याणाची जबाबदारी सोपवून प्रत्येक घरात पाणी, वीज आणि शौचालय बांधून दिले. दुर्गम भागात सौरउर्जेद्वारे वीज दिली. हेल्थ कार्ड, इन्शुरन्स कार्ड, किसान कार्ड, गॅस हमी अशा योजनाही यशस्वीपणे प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचविल्याचे सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आत्मनिर्भर भारत आणि युवकांचे योगदान' या विषयावरील मार्गदर्शन करताना

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, महाराष्ट्रातील शहरासह खेडोपाडी तळागाळापर्यंत अशा योजना पोहचण्याची गरज आहे. सरकारने इथेनॉल निर्मितीसाठी प्रोत्साहन व इंधनात २० टक्के इथेनॉल मिसळण्यास दिलेल्या परवानगीमुळे कच्च्या तेलाची आयात ८ लाख कोटींवरुन सहा लाख कोटींवर आली. त्यामुळे आगामी २०३० पर्यंत देशाला कच्चे तेल आयात करण्याची गरज भासणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी जाधव, डॉ.श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठात उद्या डॉ. ए. एन. उपाध्ये व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि बी. बी. पाटील दक्षिण भारत जैन सभा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (दि. ४) दुपारी ४ वाजता 'डॉ. ए. एन. उपाध्ये व्याख्यानमाला' आयोजित केली आहे. दसरा चौकातील जैन बोर्डिंगमध्ये होणाऱ्या या व्याख्यानमालेत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनिलकुमार लवटे मार्गदर्शन करणार आहेत. 'एकमेव, अनाक्रमक, विश्वधर्म: जैन धर्म' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, जैन बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठातील ११९ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या ऑक्टोबर महिन्यापासून परीक्षा सुरू आहेत. विद्यापीठ परीक्षांचे आत्तापर्यंत ११९ विषयांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. शनिवारी ६ हजार ८९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ५६० विद्यार्थी गैरहजर होते. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगलीत ८, साताऱ्यात ६, कोल्हापूर १ असे तीन जिल्ह्यातून १५ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. भरारी पथकाकडून नोंदीत दोषी विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

3 DEC 2023 महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलतरण स्पर्धेत मिरज महाविद्यालयास विजेतपद

मिरज,ता.१(प्रतिनिधी)-

..........................

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत सांगली विभागीय जलतरण पुरुष व महिला स्पर्धेचे संयोजन मिरज महाविद्यालय, मिरज यांनी जिल्हा क्रीडा संकुल जलतरण तलाव येथे केले होते.

सांगली विभागीय जलतरण स्पर्धेत मिरज महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतपद मिळाले. सदर स्पर्धेचे उद्घाटन प्रा.व्ही.बी.पाटील यांचे हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए.आर. जाधव होते. सदर स्पर्धेमध्ये मिरज महाविद्यालयाची राष्ट्रीय जलतरणपटू कु.योगेश्वरी महादेव कदम हिने विविध प्रकारामध्ये सुवर्णपदक मिळविले. तिने ८५ गुण प्राप्त करून स्पर्धेतील वैयक्तिक महिला विजेतपद मिळविले. तसेच ओमकार दिलीप भोसले याने विविध प्रकारामध्ये सुवर्णपदक मिळविले. त्याने ८५ गुण प्राप्त करून स्पर्धेतील वैयक्तिक पुरुष विजेतपद मिळविले. वरद महादेव कदम याने द्वितीय क्रमांक मिळविला. सदर स्पर्धेत १८१ गुण मिळवून मिरज महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतपद मिळविले. त्यांना कर्नल गुणधर देवेंद्र पाटील चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त बापू समलेवाले यांचे हस्ते पार पडला. याप्रसंगी सांगली विभागीय क्रीडा परिषद सचिव डॉ. अमितराज माने,डॉ. बाबासाहेब सरगर,डॉ. महेश पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. गणेश सिंहासने यांनी आभार मानले तर प्रा. अरूण पाचोरे यांनी सुत्रनिवेदन केले. या खेळाडूंना यशवंत शिक्षण संस्थेचे चेअरमन प्रा. शरद पाटील व सर्व संचालक यांचे प्रोत्साहन मिळाले.प्रा.संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. स्वागत व प्रास्ताविक प्रा.संजय पाटील यांनी केले.